# संध्या

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**संध्या : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये ३२०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# संध्या

## दोन शब्द.....

'संध्या' कादंबरीचा शेवटच्या प्रकरणापर्यंतचा भाग मी १९४१ साली धुळ्याच्या तुरुंगात लिहिला होता. पुढे १९४२ साली ऑगस्टच्या १० तारखेस मी सुटलो. १९४३ एप्रिलपर्यंत बाहेर होतो. शेवटचे प्रकरण त्या १९४३ च्या मार्च-एप्रिल महिन्यातल्या घाईत मी लिहून ठेवले होते. मी तुरुंगात असताना ही कादंबरी छापण्याचा बाहेरच्या मित्रांकडून प्रयत्न केला गेला; परंतु अनेक अडचणी येत व काम अर्धवट राही. मित्रांनी हे हस्तलिखित वाचून अनेक ठिकाणी काटछाट केली. मला पुन्हा लिहायला आज वेळही नाही. ही आता जशी संध्या आहे, तशीच प्रसिद्ध होवो असे मनात म्हटले. ही कादंबरी मला अतिप्रिय आहे. या कादंबरीतील साऱ्या व्यक्ती काल्पनिकच समजाव्या. कोणीही स्वत:ला काही लावून घेऊ नये. ही कादंबरी आहे, हे सर्वांनी ध्यानात धरावे.

**– साने गुरुजी**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | आजी, संध्या आता लहान नाही | ९ |
| २. | कल्याण व संध्या | १८ |
| ३. | शाळेवर झेंडे | ३७ |
| ४. | दु:खामागून दु:खे | ४७ |
| ५. | माझे लग्न लागलेले आहे | ५९ |
| ६. | पहिला तुरुंगवास | ७२ |
| ७. | घरी | ८५ |
| ८. | मॅट्रिकच्या मुलांसाठी पत्रक | १०९ |
| ९. | कल्हईचे प्रयोग | ११८ |
| १०. | मुंबई | १२९ |
| ११. | संध्येची चलबिचल | १४० |
| १२. | संध्या नि कल्याण यांचा विवाह | १६२ |
| १३. | पुन्हा मुंबईत | १७९ |
| १४. | मुंबईचा त्याग | १९६ |
| १५. | भाईजी, मी त्यांना परवानगी दिली | २१५ |
| १६. | आशेचे खेळ | २२६ |
| १७. | करुण प्रसंग | २४३ |
| १८. | भितुरडे पुणे | २६३ |
| १९. | हरणीचे लग्न | २७६ |
| २०. | भाईजी गेले | २८९ |
| २१. | सारी तुरुंगात | ३०२ |
| २२. | प्रणाम त्या संध्येला | ३०९ |

# आजी, संध्या आता लहान नाही

त्या गावचे नाव उडगी. भीमेच्या तीरावर ते वसले होते. गावची वस्ती चार-पाच हजार असेल. त्या गावात कर्नाटकी यांचे घर मोठे प्रसिध्द होते. त्या घरात तिघे भाऊ एकत्र राहात होते. वडील भाऊ नारायणराव मोठे कर्तबगारी होते. सारा गाव त्यांना मान देई. सारे भाऊ चांगले लिहिणारे-वाचणारे होते; घरी वर्तमानपत्रे येत, मासिके येत; चांगली पुस्तकेही भरपूर होती. एक प्रकारचे सुसंस्कृत वातावरण त्या घरात होते.

या त्रिवर्गाचे आईबाप लहानपणीच निवर्तले होते. त्यावेळी मोठी आणिबाणीची स्थिती होती. घरात कोणी कर्ते पुरुष माणूस नव्हते. विधवा चुलती भागीरथीकाकू हीच काय ती घरात. परंतु तिने धैर्याने घर सांभाळले. या मुलांना तिने वाढविले. शेतीभाती तिने पाहिली. आता मुले मोठी झाली होती. तिघांची लग्ने झाली होती. घरात तीन सुना वावरत होत्या. त्यांची मुलेबाळे होती. घराला भरल्या गोकुळाची शोभा होती. भागीरथीबाईला हे सारे भाग्य पाहून धन्य वाटे. केल्या कष्टाचे चीज झालेले पाहून कृतार्थ वाटे.

भागीरथीकाकूचे नारायणरावावर विशेष प्रेम होते, जणू तिला तो स्वत:चा मुलगा वाटे. ती आता थकली होती. म्हातारी झाली होती. तरीही स्वयंपाक तीच करी. आपल्या हातची भाजीभाकर नारायणाला मिळावी असे तिला वाटे.

एके दिवशी नारायणराव तिला म्हणाले, ''काकू, तू आता म्हातारी झालीस. तू स्वस्थ का बसत नाहीस? विश्रांती का घेत नाहीस? घरात आता तुझ्या सुना आहेत. त्या करतील सारे काम. त्या करतील स्वयंपाक. तू कशाला चुलीजवळ बसतेस? तू आम्हाला वाढवलंस, लहानाचं मोठं केलंस. आईबापांची आठवण तू आम्हाला होऊ दिली नाहीस. तळहाताच्या फोडाप्रमाणं तू आम्हाला जपलंस. काकू, तुझे किती उपकार, किती प्रेम! किती कष्ट तू काढलेस ! आता नको हो श्रम. तू आमच्या मुलांना खेळव. त्यांना गोष्टी सांग. रामनाम म्हण. तुझा आशीर्वाद आम्हाला दे. तू प्रेमानं आमच्याकडे पाहिलंस की आम्हाला सारं मिळतं. तू काम करू लागलीस, दुपारवेळी चुलीजवळ बसलीस म्हणजे मला कसंतरी होतं. नाही ना करणार आता काम, नाही ना बसणार चुलीजवळ?''

''नारायणा, अरे स्वयंपाक केल्यानं मला त्रास का होतो? वेडा आहेस तू! तुम्हाला माझ्या हातचं वाढताना मला आनंद होत असतो. माझा हा आनंद दूर नको करू. तू घरी नसलास म्हणजे काही मी नाही करीत स्वयंपाक. त्यावेळी माझी विश्रांती असते. परंतु तू घरी आलास म्हणजे मीच करीन स्वयंपाक. माझ्या हातच्या भाकरीचा तुला कंटाळा का आला?''

''काकू, असं काय विचारतेस? जन्मोजन्मी तुझ्या हातची भाकर मिळाली तरी कंटाळा येणार नाही. अमृताचा का कधी वीट येतो? परंतु चुलीजवळ तू बसलीस म्हणजे मला वाईट वाटतं. जन्मात थोडी तरी विश्रांती नको का?''

''नारायणा, काम केलेल्या माणसाला विश्रांतीच कंटाळवाणी वाटते. रिकामं बसणं म्हणजे त्याला मरण वाटतं. काम म्हणजेच त्याची विश्रांती. काम म्हणजेच राम. पण तुला वाईट वाटत असेल, तर नाही हो मी करणार स्वयंपाक. तुला आनंद वाटो. माझं काय?''

''काकू, आपण तडजोड करू. जर तुला नाहीच राहवलं, तर दुपारचा स्वयंपाक तू कर, पण रात्रीचा तरी करू नकोस.''

''बरं हो; तुझ्या म्हणण्याप्रमाणं.''



त्या दिवसापासून भागीरथीकाकू चुलीजवळ फारशी बसेनाशी झाली. तिचे नारायणावर विशेष प्रेम असले तरी दुसऱ्या दोघा भावांवर नव्हते असे नाही. सर्वांवर तिचा लोभ. सर्वांच्या मुलांबाळांचे ती कोडकौतुक करी. मुलांना घेऊन तुळशीच्या अंगणात बसे. त्यांना गोष्टी सांगे. कृष्ण-यशोदेची गाणी शिकवी. लहान मुलांना आंदुळी, त्यांना ओव्या म्हणे.

सर्व मुलांत संध्येवर तिचे फार प्रेम. संध्येचे तिला वेड. संध्या भीमरावांची मुलगी. मोठी खेळकर, चपळ. दिसेही गोड गोमटी. भागीरथीकाकू कधी कधी मुलांना घेऊन मळ्यात जाई. मळा मोठा सुंदर होता. मळ्यात विहीर होती. मोट चालत असे. फुलांचे ताटवे होते. भाज्या होत्या. फळझाडे होती. मळ्यात काम करणारी गडीमाणसे भागीरथीकाकू येताच प्रेमाने तिच्याभोवती जमत, फुले आणून देत. फळे आणून देत.

त्या दिवशी शाळेला सुट्टी होती. मुलांना घेऊन भागीरथीकाकू मळ्यात गेली होती. गडीमाणसे जवळ आली.

''आजी, तुम्ही आता म्हाताऱ्या झाला. इतक्या लांब कशाला येता? वाटेत दगडधोंडे, काटेकुटे.'' मोटकरी प्रेमाने म्हणाला.

''अरे, शेतावर आलं म्हणजे मी माझं म्हातारपण विसरते. या मुलाबाळांना घेऊन येण्यात एक प्रकारची मौज असते. मला इथं अनेक आठवणी येतात. पूर्वीचे दिवस आठवतात. हा मळा म्हणजे माझं रामायण. खरं ना? काय रे, कोबी केव्हा होईल तयार? संध्येला कोबी फार आवडतो.''

''होईल लवकर तयार. कुठं आहे संध्याताई?''

''ती बघ, त्या झाडावर बसली आहे. क्षणभर स्वस्थ नाही बसायची; खारकुंडीप्रमाणं इकडे उडी मारील, तिकडे पळेल. भारीच हो चपळ.संध्ये, उतर खाली. घरी नाही का जायचं? चला रे सारी.''

''मी नाही खाली येणार. माझं नाव संध्या. मी संध्याकाळी घरी येईन, तोपर्यंत या झाडावर बसून राहीन. इथं मजा आहे.''

''वर खायला कोण देईल?''

''पाखरं देतील. ती का माझ्याशिवाय खातील? मीही पाखरूच. हसतेस काय, आजी?''

''पुरे चावटपणा. उतर खाली. घरी जायला उशीर होईल.''

आजी रागावली असे पाहून संध्या खाली उतरली. तिने आजीचा हात धरला. सर्व मुले घरी निघाली.

''आजी, तू नेहमी संध्येचा हात धरतेस. आमचा कोणाचा का नाही धरीत? ती तेवढी तुझी लाडकी!'' दुसरी मुले म्हणाली.

''अरे, ती इकडेतिकडे पळून जाईल म्हणून हो मी तिचा हात धरते. तुम्ही सारी माझी आवडती, सारी लाडकी. मी सर्वांना खाऊ नाही का देत? सर्वांना गोष्टी नाही का सांगत?''

''आजी, तू रस्त्यात पडू नयेस म्हणून मी तुझा हात धरते, खरं ना?'' संध्येने हसून विचारले.

''होय हो संध्ये. मुलं म्हणजे म्हाताऱ्याची काठी.'' आजी म्हणाली.

भागीरथीकाकू रोज भीमेवर स्नानासाठी जायची. पंढरपुराहून वाहत आलेली पवित्र भीमा. उडगी गावची तीच गंगा. ती चंद्रभागा. आजीबरोबर कधी कधी संध्याही जावयाची व पाण्यात डुंबावयाची.

''संध्ये, तू आज गंगेवर येऊ नकोस. फार आहे थंडी.''

''आजी, तुला थंडी लागत नाही, मग मला कशी लागेल? मला तर भीमेच्या पाण्यात मौज वाटते. जणू मी आईच्या कुशीत शिरत आहे असं मला वाटतं. संध्येला थंडी-ऊन बाधत नाही. पाऊसपाणी बाधत नाही. तहानभूक लागत नाही. भीमेचं पाणी पिऊन माझी तहानभूक नाहीशी होते.''

''काहीतरी बोलतेस. गंगेवरून आलीस की दुप्पट खातेस. पाण्यात डुंबून भूक मरते वाटतं? बरं, चल; तू काही ऐकायची नाहीस.''

त्या दिवशी भीमेच्या पाण्यात डुंबता डुंबता संध्या जणू देहभान विसरली. तिकडे भागीरथीकाकू स्तोत्रे म्हणत होती, अभंग म्हणत होती. संध्येलाही गाण्याची स्फूर्ती आली.

''आजी, बाबांचं ते आवडतं गाणं मी म्हणू?''

''हं, म्हण; छान आहे ते गाणं.''

संध्या गाणे म्हणू लागली:



(चाल: दिन खूनके हमारे...)

भीमे वहा वहा गे
जन सर्व उद्धरावे ।।भीमे० ।।
तव गोड गोड नीर
तव धन्य रम्य तीर
सेवून लोक-माते
निष्पाप सर्व वाटे ।।भीमे० ।।
शेते तुझ्या तटीची
समृद्ध शत पटीची
देती अपार पीक
संसार हा सुखावे. ।।भीमे० ।।
घोडे तुझ्या थडीचे
होती गडी विजेचे
अटकेस दौड गेली
इतिहास नव घडावे ।।भीमे० ।।
देशी स्वराज्य माते
देशीहि मुक्ती माते
परमार्थ अन प्रपंच
दोन्हीही हाती द्यावे ।।भीमे० ।।
बाळे तुझी अम्ही गे
आम्हास वाढवी गे
दे प्रीती नि विरक्ती
मग जीव हा विसावे ।।भीमे० ।।

पाण्यात गाणे म्हणत संध्या नाचू लागली. भीमेच्या पाण्यावर ती हात मारीत होती. ताल धरीत होती. मध्येच पाण्यात बसे, मध्येच उभी राही. मध्येच गिरकी घेई. मध्येच टाळ्या वाजवी.

''संध्ये, पोरी, बाधेल हो पाणी . नीघ बाहेर.''

''भीमेचं पवित्र पाणी. चंद्रभागेचं पाणी. ते का बाधेल? वेडी आजी !''

''एवढीशी चिमुरडी आहेस, पण वाद घालीत बसतेस. बॅरिस्टर नवरा हवा मिळवून द्यायला. साध्या नवऱ्याला तू रडवशील.''

''पण मला मुळी लग्नच नाही करायचं. मी आपली तुझ्याजवळ राहीन. तुझ्याजवळ गाणी शिकेन. शेतावर जाईन. फुलं वेचीन. मोट धरीन. मला मोट आवडते. कसं धो धो पाणी येतं; नाही, आजी?''

''वेडी आहेस अगदी!''

''मघा म्हणालीस की बॅरिस्टरला हरवशील, आणि आता म्हणतेस की वेडी आहेस म्हणून. आजी, खरं सांग, मी शहाणी की वेडी?''

''आधी अंग पूस. आणि शेवटी केस भिजवलेसच ना?''

''फार नाही काही भिजले. आजी, डोक्यात शिरू दे पवित्र पाणी, चंद्रभागेचं भक्तिप्रेमाचं पाणी. आजी, मी जनाबाई होऊ ?''

''जनाबाई व्हायला पुण्य लागतं. सांगितलं होतं की डोकं बुडवू नकोस म्हणून.''

''तू तर तीनतीनदा बुडवतेस? आम्हा मुलांना मात्र आडकाठी.''

शेवटी एकदाची संध्या व भागीरथीकाकू घरी आली. संध्येचे ओले झालेले केस पाहून आईने तिला मारले. संध्या रडू लागली. आजीने तिला जवळ घेतले. तरीही तिचे मुसमुसणे चालूच होते.

''आजी, का गं आईनं मारलं? काय मी पाप केलं? जरा केस ओले झाले, ही का चूक?''

''अगं, केस ओले झाले तर पडसं होतं; आणि तसेच ओले राहिले तर मग उवा पडतात. केसात जटाही होतात. आईचं का तुझ्यावर प्रेम नाही?''

''माझ्यावर कुणाचं प्रेम नाही. संध्या कुणालाच नको. बाबा माझ्याशी कधीसुद्धा बोलत नाहीत. इतर मुलं माझ्याशी भांडतात. आई मला मारते. मोठी काकू मलाच काम सांगते. रोज मीच आपली भाजी चिरायची.''

''संध्ये, उद्या सासरी नको का सारं करायला यायला? भाजी नीट चिरता आली पाहिजे. सारं शिकायला हवं, बाळ. नुसतं पुस्तकं वाचून नाही हो संसार करता येत?''

''म्हणून वाटतं मला शाळेतून काढलंत?''



''अगं, आता आणखी किती शिकायचं? बी. ए. व्हायचं आहे वाटतं? नोकरी का करायची आहे? उद्या लग्न करायला हवं. तरी का शाळेत ठेवायची?''

''माझं नकाच लग्न करू. मी का सर्वांना नकोशी झाले?''

''संध्ये, तू वेडी आहेस. मुलींची लग्नं व्हायचीच.''

''मग जिथं भाजी चिरावी लागणार नाही, तिथं द्या मला.''

''भाजी साऱ्यांनाच लागते.''

''गरिबांकडे कुठं असते रोज उठून भाजी?''

''तुला का गरीब नवरा हवा?''

''हो.''

''काहीतरी बोलतेस.''

''थोबाडीत द्या एक. तुम्ही तिला लाडावून ठेवली आहे. फाजीलपणं बोलायला सांगा. ऊठ. ती पाणी पिण्याची भांडी आण घासून आणि सोप्याचा केर काढ. ऊठ.'' तिकडून आई रागाने बोलली.

बिचारी संध्या उठली. तिने भांडी घासली. नीट लख्ख नाही निघाली म्हणून पुन्हा चिंच लावून तिने ती घासली. भांडी आरशासारखी हवीत असे तिला वाटे.

''झाली की नाही घासून? भांडी घास म्हटलं, तिथंच घाशीत बसली. दुसरी कामं आहेत की नाहीत? उद्या सासरी तुझं कसं बाई व्हायचं?''

''आई, भांडी स्वच्छ नकोत का? बघ तरी कशी घासली आहेत ती? माझं तोंड त्यात दिसत आहे.''

संध्या स्वच्छतेची भोक्ती होती. इवलीही घाण तिला खपत नसे. स्वतःचे कपडे ती स्वतः धुवी. ती आपले स्वतःचे भांडे घाशी. तिची एक उशी होती. त्या उशीचा अभ्रा ती स्वच्छ ठेवी. तिला कोणतेही काम सांगा. ती ते निर्मळ नीटनेटके करी. केर काढील तर इवलासासुद्धा राहू देणार नाही. भाजी चिरील तर सुंदर व्यवस्थितपणे चिरील. सारे कौशल्य त्या चिरण्यात ओतील. पालेभाजी असली, तर पाने नीट जुळवून घेऊन मग चिरील.

''संध्ये, किती तुझी टापटीप!'' आजी म्हणायची.

''परंतु वेळ लावील खंडीभर!'' चुलती म्हणायची.

''चांगलं काम पटकन कसं करता येईल?'' संध्या उत्तर द्यायची.

‘‘काम चांगलं करून ते पुन्हा लवकर झटपट करता आलं पाहिजे.’’ आजी समजूत घालीत म्हणायची.

‘‘फुलं वाटतं झटपट फुलतात, फळं वाटतं झटपट पिकतात? आजी, मला आपला वेळ लागतो.’’ संध्या शांतपणे सांगायची.

आणि त्या दिवशी भाजी चिरायला तिनं असाच कितीतरी वेळ लावला.

‘‘संध्ये, केव्हा गं आटपणार तुझी भाजी?’’ चुलती त्रासून म्हणाली.

‘‘संध्ये, उद्या नवऱ्याकडे गेलीस म्हणजे कसं होईल? त्याला घाईनं नोकरीवर जावं लागेल. दहाला पानं वाढावी लागतील. तू जर तासन्‌तास भाजीच चिरीत बसलीस, तर कसं व्हायचं? नवऱ्याला उपाशी जायची पाळी यायची, नाहीतर त्याची नोकरी जायची. घरच्या बायकोला प्रसन्न राखील तर साहेबाची मर्जी खप्पा होईल!’’ आजी हसून म्हणाली.

‘‘आजी, नेहमी उठून तुमचं आपलं एक बोलणं की सासरी कसं होईल? मला नकोच सासर. नकोच लग्न. आणि केलंतच लग्न, तर नोकरीवाला नवरा मला देऊ नका. म्हणजे साहेबाची मर्जी जायची भीती राहणार नाही.’’

‘‘नोकरीवाला नको, तर कोण हवा? एखाद्या राजाची राणी होणार आहेस वाटतं?’’

‘‘न व्हायला काय झालं?’’

‘‘कोणत्या गं राजाची?’’

‘‘शेतात काम करणाऱ्या राजाची.’’

‘‘कामं करणारे ते का राजे?’’

‘‘होय हो, आजी. ते मागं कोण बरं आले होते आपल्याकडे, ते बाबांजवळ नव्हते का म्हणत पुढंमागं शेतकऱ्यांचंच राज्य होईल, काम करणाऱ्यांचं राज्य होईल, गरिबांचं राज्य होईल म्हणून! आणि त्यांच्याजवळून मी ते गाणं टिपून घेतलं आहे. त्यात नाही का–

‘भविष्य राज्य तुम्हारा मानो
ऐ मजदूरों और किसानो’
आजी, त्यांचंच हो पुढं राज्य होईल.’’

‘‘काबाडकष्ट करणाऱ्या गरीब राजाची तू राणी होणार एकूण?’’



‘‘साहेबाच्या गुलामाची होण्यापेक्षा गरिबाची होणंच चांगलं.’’

‘‘संध्ये, तू वेडी आहेस; वाटेल ते बोलतेस; मुलींनी स्वतःच्या लग्नाच्या गोष्टी बोलू नयेत.’’

‘‘माझ्या लग्नाचं मी नये बोलू? आजी, मी वेडी की तू वेडी? आजी, तुझी संध्या आता लहान का आहे? मला सारं समजतं; मी वेडी नाही.’’

‘‘बरं, राहिलं. मी वेडी हो. मी आता म्हातारी झाले; साठी बुद्धी नाठी. मीच वेडी हो.’’ असे आजी खिन्नपणे म्हणाली.

आजीचा खिन्न स्वर ऐकून संध्येला वाईट वाटले. तिने आजीकडे पाहिले. आणि नंतर आजीच्या गळ्याला तिने मिठी मारली. आजीने तिला प्रेमाने जवळ घेतले.

✦✦

# कल्याण व संध्या

कल्याण मोठा हूड होता. त्याच्या सुपाणी गावात त्याच्यासारखा खेळकर मुलगा नव्हता. सुपाणी गावालाही भीमा होती. भीमेचे पवित्र पाणी त्या गावाला मिळे, म्हणून का सुपाणी नाव? कल्याणचे शरीर गोटीसारखे होते. त्याचा वर्ण काळासावळा होता. तोंड वाटोळे होते. डोळे मोठे व काळेभोर होते. त्याला पाहताच प्रेम वाटे. मोह वाटे. आरोग्याचे उत्कृष्ट सौंदर्य त्याच्याजवळ होते. गावातील मुलांचा तो म्होरक्या होता. तो नवीन नवीन खेळ शोधून काढी. मुलांना कवायत शिकवी. पोहण्यात तो पटाईत होता. भीमेला पूर यावा व कल्याणच्या हृदयालाही पूर यावा. तो लहान होता; परंतु भीती ही त्याला ठाऊक नव्हती. भीमेचे सहस्रावधी तरंग त्याला जणू नाचवीत. एखाद्या मुलाप्रमाणे तिच्या फेसाळ पाण्यावर तो तरंगे. भित्र्या मुलांना तो धीट करी, त्यांना उड्या टाकायला लावी. कल्याण म्हणजे भेकडांना शूर करणारा, रडक्यांना हसवणारा, दुबळ्यांना झुंजार करणारा. तो घरबश्या मुलांना बाहेर काढी व खेळायला लावी. कल्याण म्हणजे मूर्तिमंत उत्साह; मूर्त स्फूर्ती, मूर्त ज्योती. नवभारताचा तो अभिनव युवक होता. उगवत्या भारतभाग्यसूर्याचा तो अरुण होता.



उडगी गाव सुपाणी गावाहून फार दूर नव्हते. उडगी गावची मुले कल्याणला कवायत शिकविण्यासाठी बोलावीत. कल्याण जाई. तेथील मुलांचाही तो आवडता झाला. कधी कधी उडगी गावातील रस्त्यातून तो मुलांना कवायत करीत नेई. ती व्यवस्थित जाणारी तुकडी पाहून सर्व स्त्रीपुरुषांना आनंद होई. संध्याही रस्त्यावर येऊन बघे. कधी सुपाणी गावची मुले उडगी गावी येत व उडगी गावची मुले सुपाणीस जात. अशा वेळेस संयुक्त कवायत होई. रंग चढे. उडगी व सुपाणी गावांतील खेळाडूंचे कधी खेळ होत व पाहायला पुष्कळ मंडळी जमत.

असा हा कल्याण वाढत होता. त्याचे वय सोळा-सतरा वर्षांचे होते. तो कुस्ती छान खेळे. पळण्यातही तो पहिला येई. परंतु अलीकडे कल्याण बाहेर पडेनासा झाला. त्याच्या गावात इंग्रजी पाचवीपर्यंत शाळा होती. त्याची पाचवी इयत्ता झाली. पुढे पुण्याला शिकावयास जावे असे त्याच्या मनात होते; परंतु वडील पाठवेनात. तो दु:खी झाला.

गावातील मुलांना संध्या विचारी, की तो कल्याण का येत नाही?

''तो घरातून बाहेर पडत नाही.'' असे मुले सांगत.

असे काही दिवस गेले आणि एक प्रसंग आला. उडगी गावात मोठ्या प्रमाणात खेळ व कुस्त्या करण्याचे काही हौशी मंडळींनी ठरविले. कल्याणची स्वयंस्फूर्ती जागी झाली. त्याने अठरा वर्षांच्या आतील मुलांच्या कुस्त्यांत नाव दिले.

''संध्याताई, कल्याण कुस्तीसाठी येणार आहे. त्यानं नाव दिलं आहे.'' एका मुलाने सांगितले.

''खरंच?''

''हो.''

''कल्याण कुस्तीत विजयी होईल.''

''कशावरून?''

''मला आपलं वाटतं.''

''तू येणार आहेस खेळ पाहायला?''

''हो, शाळेतील मुली एका बाजूला बसणार आहेत. त्यांत मी जाऊन बसेन.''